# ठाणे महानगरपालिका, ठाणे

## नागरिकांना आवाहन

ठाणे महापालिका क्षेत्रातील पार्किंग धोरणाची अंमलबजावणी करण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे. प्रथम टप्प्यात रात्रीच्या वेळी जे नागरीक सार्वजनिक रस्त्यावर आपली वाहने पार्क करतात त्यांचेकडून महानगरपालिकेमार्फत पार्किंग शुल्क वसूल करण्यात येणार आहे. जे नागरीक महानगरपालिकेकडे रात्रीच्या पार्किंगसाठी प्रथम विनंती करतील त्यांना महापालिकेमार्फत सशुल्क पास पुरविण्यात येतील. सदरहू पासेस महानगरपालिकेच्या संबंधित प्रभाग समिती सहाय्यक आयुक्तांच्या कार्यालयात उपलब्ध होतील. सदरचे पासेस दि. १/१०/२०१६ ते दि. १५/१०/२०१६ पर्यत महानगरपालिकेने मंजूर केलेल्या दराप्रमाणे मिळू शकतील. जे नागरीक या कालावधीमध्ये पासेस उपलब्ध करुन न घेता त्यांची वाहने सार्वजनिक रस्त्यावर रात्र पार्किंगच्या ठिकाणी उभी करतील अशा नागरिकांवर दंडात्मक कारवाई करण्यात येईल. रात्र पार्किंगच्या ठिकाणांची यादी व पार्किंग शुल्क माहिती महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळ www.thanecity.gov.in वर उपलब्ध आहे.

सुनिल चव्हाण, भा.प्र.से.
आयुक्त,
ठाणे महानगरपालिका, ठाणे

**Thane Municipal Corporation**

Appeal to Citizens

Thane Municipal Corporation has decided to implement the Parking Policy. In the first of implementation TMC will recover the parking charges from the owner of vehicle who parks their vehicle on the public street at night. TMC will issue the monthly parking pass on request. The monthly passes are available in the office of Assistant Municipal Commissioner of respective ward offices. The monthly passes can be availed from 1/10/2016 to 15/10/2016 according to the rates sanctioned by Municipal Corporation.

The penal action will be taken against those who will park their vehicles on public street without obtaining the monthly passes .The details regarding night parking Locations, Parking rates is available on the official website of TMC, www.thanecity.gov.in

Sunil Chavan IAS
Municipal Commissioner
Thane Municipal Corporation ,Thane

प्रकरण क्रमांक ७२ :- पार्किंग धोरणा अंतर्गत पार्किंगचे दर निश्चीत करणेबाबत. ८/१३१ ८/२२५

ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक ९२२ दिनांक ०८/०९/२०१५

ठ रा व :-

प्रकरणी कार्यालयीन अहवाल पाहता, ठाणे महानगरपालिका क्षेत्रातील पार्किंग धोरणास मा. महासभेने ठराव क्र.७, दि. १७.०४.२०१३ अन्वये मान्यता दिली आहे. सदर ठरावा अन्वये प्रशासनाने सादर केलेल्या पार्किंग धोरणास मान्यता दिली असली तरी प्रशासनाने प्रस्तावित केलेल्या पार्किंग शुल्कात बदल करण्यात आलेले असून याबाबत अंतिम निर्णय मा.महापौर यांच्या समवेत गटनेत्यांच्या बैठकीमध्ये घेण्यात यावा, असे नमूद करण्यात आले आहे. तथापि, अद्याप पर्यंत गटनेत्यांच्या बैठकीत झालेला निर्णय प्रशासनास कळविण्यात आला नसल्याने, प्रशासनामार्फत खालील बाबींस मान्यता मिळण्याचा प्रस्ताव फेर सादर करण्यात येत आहे.

१) पार्किंग धोरणास मा.महासभेने ठराव क्र.७, दि.१७.०४.२०१३ अन्वये मान्यता दिली असून रस्त्याच्या ग्रेडनुसार खालीलप्रमाणे पार्किंग शुल्क निश्चित करण्यास मान्यता असावी.

अ) दुचाकी वाहनांसाठी पार्किंग शुल्क रचना-

| रस्त्याचा प्रकार | पार्किंग शुल्क | | |
|---|---|---|---|
| | पहिले दोन तास रू. | दोन ते चार तास या कालावधीत अतिरीक्त रू. प्रतितास | चार तासापुढील प्रत्येक तासाला अतिरीक्त रू. |
| अ वर्ग रस्ता | १० | ५ | ५ |
| ब वर्ग रस्ता | १० | ५ | ५ |
| क वर्ग रस्ता | १० | ५ | ५ |
| ड वर्ग रस्ता | १० | ५ | ५ |

ब) खाजगी चारचाकी वाहनांसाठी पार्किंग शुल्क रचना-

| रस्त्याचा प्रकार | पार्किंग शुल्क | | |
|---|---|---|---|
| | पहिले दोन तास रू. | दोन ते चार तास या कालावधीत अतिरीक्त रू. प्रतितास | चार तासापुढील प्रत्येक तासाला अतिरीक्त रू. |
| अ वर्ग रस्ता | २५ | ५ | १० |
| ब वर्ग रस्ता | २० | ५ | १० |
| क वर्ग रस्ता | १५ | ५ | १० |
| ड वर्ग रस्ता | १० | ५ | १० |

क) मासिक पार्किंग शुल्क रचना-

| रस्त्याचा प्रकार | ओव्हर नाईट ( अहोरात्र) पार्किंग शुल्क | | |
|---|---|---|---|
| | तीन चाकी रिक्षा रू. प्रति महिना | चार चाकी वाहन रू. प्रति महिना | कमर्शियल वाहन |
| अ वर्ग रस्ता | ५००/- | लागु नाही | लागु नाही |
| ब वर्ग रस्ता | | ७५०/- | चार चाकी वाहनाच्या दुप्पट |
| क वर्ग रस्ता | | ५००/- | |
| ड वर्ग रस्ता | | ५००– | |

२.....

१) पार्किंग धोरण राबविण्यासाठी आवश्यक पार्किंग मार्शल व पार्किंग सुपरवायझर यांचे पद निर्माण करून महापालिकेच्या आस्थापनेवर नियुक्ती करण्यास मा.महासभेने ठराव क्र.७, दि.१७.०४.२०१३अन्वये मान्यता दिली आहे. तथापि, महापालिकेची आर्थिक स्थिती तसेच रस्त्या-व्यतिरीक्त पार्किंग सुविधा विकसीत करून टप्प्या-टप्प्यात रस्त्यावरील पार्किंग बंद करण्यात येणार असल्यामुळे भविष्यात पार्किंग मार्शल व पार्किंग सुपरवायझर यांचेवरील आस्थापना खर्चाच्या दायित्वाचा मोठ्या प्रमाणात बोजा पडणार आहे. त्यामुळे पार्किंगचे परिचलन " अप फ्रंट प्रिमीअम " तत्वावर करण्याचे प्रस्तावीत करण्यात येत आहे. मा. महासभेने मंजुर केलेल्या पार्किंग धोरणातील रस्त्यांचे गट करून, सदर रस्त्यांवरील पार्किंगपोटी मिळणारे शुल्क व पार्किंगचे परिचलन करण्यासाठी येणारा खर्च विचारात घेऊन किमान अप फ्रंट प्रिमीअम निश्चीत करण्यात येईल. त्यानुसार इच्छुकांकडून जाहीर स्वारस्य अभिव्यक्ती / निविदा मागविण्यात येवून जास्तीत जास्त प्रिमीअम महापालिकेस देणा-या संस्थेची निविदा स्विकारण्याची कार्यवाही करण्यात येईल. त्यामुळे महापालिकेच्या आस्थापनेवर खर्च होणार नाही व पार्किंग सुविधाही नागरिकांना उपलब्ध होईल. पार्किंगचे परिचलन " अप फ्रंट प्रिमीअम " तत्वावर करण्यास व त्यानुसार स्वारस्य अभिव्यक्ती / निविदा मागविण्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे.

२) प्रशासनामार्फत प्रस्तावित करण्यात आलेले पार्किंग शुल्क हे रस्त्यावरील पार्किंग करणा-या वाहनांसाठी आहे. पार्किंगच्या सर्वसाधारण मार्गदर्शक तत्वानुसार रस्त्यावरील पार्किंगपेक्षा रस्त्या-व्यतिरीक्त पार्किंगचे दर कमी असतात. त्यानुसार ज्या भागात रस्त्या--व्यतिरीक्त पार्किंग सुविधा / वाहनतळ उपलब्ध होईल, त्याठिकाणी रस्त्या-व्यतिरीक्त पार्किंग सुविधेतील पार्किंग शुल्क हे त्या भागातील रस्त्यावरील पार्किंग शुल्काच्या २५ टक्के ने कमी (सदरची रक्कम नजिकच्या १ रूपया पुर्णांकामध्ये गणणा करून ) आकारण्यास ही सर्वसाधारण सभा मान्यता देत आहे. तसेच रस्त्या व्यतिरिक्त पार्किंग सुविधा उपलब्ध केलेल्या ठिकाणी दिवसाच्या १२ तासासाठी मासिक शुल्क खाजगी चारचाकी वाहनासाठी रु. १०००/- प्रति महा व दुचाकी वाहनासाठी रु. ५००/- प्रति महा आकारण्यांत यावे असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे. तथापि मासिक ओव्हरनाईट(अहोरात्र) शुल्क हे रस्त्यावरील ओव्हरनाईट(अहोरात्र) पार्किंग शुल्का इतकेच राहिल. पर्किंगपासून मिळणा-या शुल्काचा उपयोग हा त्या त्या प्रभाग समिती क्षेत्रातील पार्किंग सुविधेच्या विकास कामांकरीता व उद्यावत पार्किंग सुविधा विकसित करणे कामी करण्यांत यावा असे ही सर्वसाधारण सभा ठरवित आहे.

पार्किंग धोरणाची अंमलबजावणी करण्यासाठी आवश्यक ते निर्णय घेण्यास ही सर्वसाधारण सभा मा. आयुक्त सो. यांना प्राधिकृत करीत आहे.

प्रकरणी तांत्रिक बाजू व कायदेशिर बाबी प्रशासनाने तपासल्या असुन, त्या योग्य व कायदेशिर आहेत असे गृहित धरुन ही सर्वसाधारण सभा सदरच्या प्रस्तावात मान्यता देत आहे.

**सूचक :- सौ.अनिता गौरी** **अनुमोदक :- श्री. संतोष वडवले**

**बहुमताने मंजूर.**

**महापौर,**
**ठाणे महानगरपालिका, ठाणे**

**प्रत :- मा.आयुक्त सो. यांजकडे माहितीसाठी सादर.**